# प्रेसनोट

दि. १५/०३/२०२३

बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस हवालदारावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. १४७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - २७ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक प्रदीप दत्तात्रय काळे, वय ४४ वर्ष, पोलीस हवालदार, बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ९,०००/- (नऊ हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २५/०१/२०२३
गुन्हा दाखल दिनांक :- १५/०३/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचेविरुद्ध बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असून, त्या गुन्ह्यात न्यायालयाने तक्रारदारास पोलीस ठाण्यात हजेरी देण्याबाबत आदेश दिले होते. त्या हजेरीची नोंद घेण्यासाठी व गुन्हा तपासात तक्रारदाराच्या बाजुने मदत करण्यासाठी लोकसेवक प्रदीप काळे यानी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे बरोबर चर्चा करुन मा. न्यायालयाने आदेशीत केलेल्या हजेरीची नोंद घेण्यासाठी व गुन्ह्याच्या तपासात तक्रारदाराच्या बाजुने मदत करण्यासाठी लोकसेवक प्रदीप काळे यानी ९,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, लोकसेवक काळे याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.